MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक – दिपक थोरात

अशोक मुदिराज यांना माहिती विचारा पोलीस कर्मचारी उगले सांगतो आरोपीचे नावपेठ बीडचे पिआय अशोक मुदिराज यांना माहित आहेत.?
पीडित भोळसर मुलीने अत्याचार झालेला पॅड बीड पोलिसांना सांगितल्यानंतर सुद्धा गुन्हा दाखल का केला नाही.?
पेठ बीड पोलिसांनी जिव्हाळा केंद्र नवी भाजी मंडई येथे त्या मुलीला कोणाच्या परवानगीने ठेवले जिव्हाळा केंद्राशी कोणती परवानगी घेतली होती का कागदपत्रे व्यवहार पेठ पोलीस स्टेशन ने केला होता का.?

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०१ | अंक –२९७ | शनिवार दि.२० जुलै २०२४ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -297 | SATURDAY DT. 20 JULY 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# एस पी नंदकुमार ठाकूर साहेब भोळसर मुलीवर अत्याचार प्रकरणातील आरोपींना सोडून देणाऱ्या

# पेठ बीड पोलीस स्टेशनचे पीआय अशोक मुदिराज पोलीस कर्मचारी उगले ला तात्काळ निलंबित करा?

- पेठ बीड पोलीस कर्मचारी नाईट ड्युटीवर असलेला उगलेनी आरोपींना का सोडून दिले अशोक मंदिराज यांनी उगलेना विचारावं उगले सांगतो पी आय मुदिराज यांना माहित आहे आरोपींचे नाव?
- पोस्को ॲट्रॉसिटी विनयभंगाचा गुन्हा दाखल करून आरोपींना गजाआड करायला हवे परंतु आर्थिक करून उगले ने सोडून दिले नाराधाम पप्पूला?



एस पींनी पोलीस कर्मचारी उगलेला समोर उभा करून पीडितेवर अन्याय करणाऱ्या आरोपींची नावे विचारून आरोपींना जाळ करावे?

काल झालेल्या भोळसर मुलीवर अत्याचार प्रकरणातील नराधमाना पेठ बीड पोलिसांनी आर्थिक आर्थिक तडजोडीत सोडून दिले.?

पोलीस कर्मचारी उगले उबाळे मुदिराज यांच्यातील संभाषण झालेल्या फोन कॉल चे डिटेल तपासणी गरजेचे?

पेठ बीड पोलिसांनी गुन्हेगारांना शह देण्यासाठी व आपले आर्थिक पोळी भाजण्यासाठी माहेर असलेले पोलीस स्टेशन म्हणजे पेठ बीड पोलीस स्टेशन.?

**पीआय अशोक मुदिराज पोलीस कर्मचारी उगले यांचा नंगानाच**

पेठ बीड पोलीस स्टेशन ने उडवावी चे उत्तर देत पीआय अशोक मुदिराज पोलीस कर्मचारी उगले यांनी नंगानाच करून पोलीस स्टेशन मध्ये आर्थिक तोडजोड करून त्या मुलांना का सोडले हे मुदिराजांनी विचारणे गरजेचे होते परंतु पेडवे पोलीस स्टेशनचे अशोक मुंडे राजांनी संबंधित पीडित भोळसर मुलीला जिव्हाळा केंद्र भाजी मंडई येथे नेऊन सोडले परंतु त्यांनी त्या ठिकाणी त्या मुलांना का सोडून दिले व नंतर चौकशीसाठी त्या मुलांना बोलवले का नाही असा सवाल यावेळी उपस्थित होत आहे. पेड बीड पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी उगले यांनी संबंधित मुलीला घटनास्थळावरून रमेश उगले फौजदार यांनी त्या ठिकाणाहून पोलीस स्टेशनला आणले मुलीला संबंधित पोलीस स्टेशन अंतर्गत आणल्यानंतर त्यांनी जीवा केंद्र या ठिकाणी सुरक्षा अभावी ठेवण्याची बाब समोर आली आहे परंतु आरोपी नराधमांना का सोडून दिले असाही सवाल यावेळी उपस्थित होत आहे.?

संबंधित प्रकार हा १८ तारखेला मध्यरात्री साडेबारा ते एकच्या दरम्यान संघा दैनिक महाराष्ट्र आरंभीचे संपादक दीपक थोरात यांच्या फोनवरती एका नवीन नंबर वरून फोन आला संबंधित फोन आल्यानंतर त्यांनी सविस्तर घटना सांगितली की या ठिकाणी अशी अशी मुलगी आहे त्या भोळसर मुलीवरती चार ते पाच जणानी अत्याचार करत आहेत आम्ही त्या नराधमांना रंगीहात पकडले आहे व त्यांना त्या ठिकाणी १०० पन्नास लोकांच्या जमावाने चांगला चोप देऊन पोलिसांनि बोलून त्यांच्या पोलिसांच्या स्वाधीन केले आहे परंतु पोलिसांनी त्यांना अर्ध्या रस्त्यातच सोडून दिले आहे का हे तुम्ही बघा असंही त्यावेळी त्या फोनवरील सांगणारे व्यक्तीने माहिती दिली असल्यामुळे हे प्रकरण बाहेर आले आहे अन्यथा पेडवे पोलिसांनी आर्थिक तडतडीमध्ये करून हे प्रकरण दाब दडप करण्याचा प्रयत्न केला होता.?

बीड /प्रतिनिधी

अल्पवयीन बोळसर मुलीवरती अत्याचार करत असताना रंगीहात पकडलेल्या आरोपींना बबीड पोलीस ठाणे पोलिसांनी सोडून देण्याची धक्कादायक बाब समोर आली आहे यावेळी पॉलिटेक्निकल कॉलेजच्या समोरील पाण्याच्या टाकी खाली मध्यरात्री साडेबारा ते एकच्या दरम्यान तीन ते चार भोळ सर मुलीला जी की बोळसर मुलीला त्या ठिकाणी अत्याचार करताना पकडले रात्री चोरांची अफवा असल्यामुळे गस्त प्रकाश आंबेडकर नगर मधील लोकांनी त्यांना पकडले त्यानंतर नराधामंना चांगला चोप दिला व पोलिसांना त्या ठिकाणी बोलावून पोलिसांच्या स्वाधीन संबंधित पीडित मुलगी व ते नराधम यांना स्वाधीन केले

- पेठ बीड पोलीस स्टेशनच्या कर्मचाऱ्यांना स्वतः पीडित मुलीने सांगितले की माझ्यावर अत्याचार केला आहे त्याने?
- काल झालेल्या भोळसर मुलीवर अत्याचार प्रकरणातील नराधम पेठ पोलीस स्टेशनच्या उगलेने आर्थिक तडतडीत सोडून दिलेलं पीआय अशोक मुदिराजांना माहित नाही नसेल का
- पेठ बीड पोलिसांची संबंधित प्रकरणासाठी पळापळी प्रकरणांमध्ये पिआयअशोक मुदिराज गुंतणार?
- पीडित भोळसर मुलगी सांगते की माझ्यावर अन्याय झाला तरीही पेठ बीड पोलिसांनी गुन्हा दाखल का केला नाही असा एक प्रश्न यावेळी बीड शहरातील जनतेला पडला आहे
- बीड पोलीस ठाण्याचे पीआय अशोक मुदिराज उगले उबाळे यांनी अल्पवयीन बोळसर मुलीवर अत्याचार करणाऱ्या नराधमांना दिले सोडून का दिले
- उगले नावाच्या पोलिस कर्मचाऱ्यांनी केली आर्थिक तडजोड पप्पूला सोडून दिल्यामुळे एसटी नंदकुमार ठाकूर उगलेला निलंबित करा.
- हनुमंत उगले पोलीस कर्मचाऱ्यांनी आरोपी दिले सोडून नराधम आरोपींची गाडी व्हिडिओमध्ये स्पष्ट दिसत आहे

## मनसे नेते करण लोंढे यांनी पेड बीड पोलिसांना जाब विचारला

काल पासून गेल्या दोन दिवसात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे युवा नेते शहराध्यक्ष करण लोंढे यांनी पेडवे पोलिसांना धारेवर धरत त्यांच्याकडून संबंधित मुलीला न्याय मागण्याचा प्रयत्न केला पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर अतिरिक्त पोलीस अधीक्षक सचिन पांडकर पेडवे पोलीस स्टेशनचे पीआय अशोक मंदिरात यांच्याशी संबंधित मुलीला न्याय मिळावा म्हणून काल २४ तासापेक्षा जास्त होऊन सुद्धा गेल्या दोन दिवसापासून करण लोंढे हे त्या मुली सोबत व त्या मुलीच्या परिवारांसोबत सावलीसारखे उभा राहिले आहेत यावेळी करण लोंढे यांनी पोलिसांसह सर्वांना धारेवर धरले तर या मुलीच्या आई-वडिलांना व मुलीला जेवण नाश्ता चहा सर्व बाबतीमधील जिम्मेदारी घेत त्यांनी पुढाकार घेतला व या प्रकरणाला वाचा पडण्याचे काम यावेळी करण लोंढे व दैनिक महाराष्ट्र आरंभ ने केले आहे

## गोलमाल

पेठ बीड पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये अल्पवयीन भोळसर मुलीवर अत्याचार झाल्याची घटना घडली होती यामध्ये स्वतः भोळसर पीडित मुलीने पेड बीड पोलिसांना सांगितले की माझ्यासोबत त्याने काय अत्याचार केले यानंतर संबंधित मुलीला तपासणीसाठी जिल्हा रुग्णालयात आणण्यात आलेले आहे परंतु यावेळी संबंधित मुलगी ही मानसिक रुग्ण असल्यामुळे बोळसर असल्यामुळे ती ममेडिकल तपासणी करून देत नाही. म्हणून आम्ही गुन्हा दाखल केला नाही असं पोलीस प्रशासन म्हणत आहे परंतु ही साथ चुकीचा आहे संबंधित मुलगी ही मागासवर्गीय समाजातील मातंग समाजाची असून या मुलीवरील अत्याचार प्रकरणात अल्पवयीन मुलगी म्हणून पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल झाला पाहिजे तर यावेळी मात्र विनयभंगाचा सुद्धा गुन्हा दाखल झाला पाहिजे तर ट्रॉसिटी क्टनुसार संबंधित नराधमांवरती गुन्हा दाखल करावा अशी मागणी यावेळी नागरिकांकडून होत आहे परंतु पेड बीड पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी असलेले पीआय अशोक मंदिराज हे मात्र संबंधित प्रकरण तडजोडी करणाऱ्या उगले नावाच्या पोलिसाच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहेत उगल्या म्हणतो की मला काय माहित नाही तुम्ही पिया मंदिरा साहेब यांना विचारा यामुळे मंदिरात साहेब यांची सुद्धा बदनामी होत आहे परंतु यावेळी मंदिरात साहेब यांनी ही कारवाई कोणत्या आधारे करायची असा प्रश्नचिन्ह निर्माण केला आहे संबंधित प्रकरणात ट्रॉसिटी पोस्को व विनयभंगा अंतर्गत गुन्हा दाखल करणे बंधनकारक असताना सुद्धा यावेळी मात्र त्यांनी काहीच न करण्याचा विडा उचलला आहे का असा प्रश्न जनतेला पडला आहे

संबंधित पेठ बीड पोलीस स्टेशन भोळसर मुलीला काल रात्री आपल्या ताब्यात घेऊन बीड शहरातील बशीरगंज भागातून ताब्यात घेतले आणि संबंधित मुलीला मेडिकल साठी तपासणीसाठी बीड जिल्हा रुग्णालय ठिकाणी घेऊन गेले परंतु मुलीचे आई-वडिलांची सहीच्या नावाखाली त्यांनी परत आणले व पुन्हा आज दुपारी या मुलीला तिच्या आई-वडिलांसमोर मेडिकल साठी हजर केले असता सरकारी दवाखान्यामध्ये मुलीने मेडिकल करून दिले नाही अशी माहिती यावेळी पोलीस स्टेशनकडून मिळाली आहे

पेड बीड पोलीस स्टेशनच्या कर्मचारी उगलेला पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी समोरासमोर घेऊन माहिती विचारावी व आरोपींना तात्काळ गजा ऍड करून यावेळी पोस्को ट्रॉसिटी व विनयभंगाच्या गुन्ह्यांमध्ये आरोपींना गजा करावी अशी मागणी यावेळी बीड शहरातील जनतेकडून करण्यात येत आहे

## युवा चेतना फाऊंडेशनचा उपक्रम

# पांडुरंगाच्या पंढरीत स्वच्छता अभियानाच्या वारीने वेधले लक्ष

पंढरपूर ।प्रतिनिधी

युवा चेतना फाऊंडेशन, आर्ट ऑफ लिव्हिंग आणि पंढरपूर नगर परिषदेच्या संयुक्त विद्यमाने १९ जूलै रोजी महास्वच्छता अभियान राबविण्यात आले. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात आलेल्या चारशेहून अधिक स्वयंसेवकांनी ओला-सुका कचरा गोळा करून, चंद्रभागा परिसरात स्वच्छतेच्या वारीचा उपक्रम राबविला. दरम्यान, युवा चेतना फाऊंडेशनच्या उपक्रमाचे वारकऱ्यांनी कौतुक केले असून, पांडुरंगाच्या पंढरीत पार पडलेल्या महास्वच्छता अभियानाच्या वारीने वेधले लक्ष वेधले. गेल्या दहा वर्षापासून युवा चेतना फाऊंडेशन चे प्रमुख अमर कळमकर यांच्या नेतृत्वाखाली एकच सूर, स्वच्छ करू पंढरपूर, हा उपक्रम सुरू आहे. दरवर्षी आषाढी एकादशीनिमित्त दरवर्षी लाखो

भाविकांचा मेळा पांडुरंगाच्या पंढरीत येतो. एकादशीच्या दुसर्या दिवशी वारी परतीच्या दिशेन निघते. त्याच्या दुसर्याच दिवशी चंद्रभागा परिसरात, युवा चेतना फाऊंडेशन, आर्ट ऑफ लिव्हिंग, नगर परिषदेच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छता अभियान राबवण्यात येते. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेले चारशेहून अधिक स्वयंसेवक अभियानात सहभागी असतात. १९ जूलै रोजी सकाळी नऊ वाजता चंद्रभागा, ६५ एक्करचा परिसर आणि मंदिरा जवळचा परिसरात ओला - सुका कचरा, तुटलेल्या चपला, फेकून दिलेले कपडे, कुजलेला कचरा गोळा करण्यात आला. आर्ट ऑफ लिव्हिंगच्या माध्यमातून आणि समाजसेवक अमर कळमकर यांच्या मार्गदर्शनाखाली व युवा चेतना फाउंडेशनच्या सहकार्याने हे अभियान राबवण्यात आले. एकच सूर स्वच्छ पंढरपूर चा नारा देत, अभियानाला सुरूवात झाली. अभियानामध्ये पुणे, नगर, निघोज, सोनई, बीड, गेवराई येथील महिला, युवक, युवती, ज्येष्ठ स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. कचरा एका ठिकाणी जमा केल्यानंतर, नगर परिषद च्या जेसीबीने वाहणात भरून, डंपिंग परिसरात टाकण्यात आला. सामाजिक भान आणि कुठल्याही प्रकारच्या आर्थिक मदतीची अपेक्षा न ठेवता ,युवा फाऊंडेशनचे कार्कर्ते अकरा वर्षापासून सेवा करीत आहेत. पंढरपुरातील ६५ एकराचा वारी तळ, गोपाळपूर, वाळवंट परिसर, चंद्रभागा नदी परिसर, भक्ती मार्ग आदी भाग स्वच्छ करण्यात आला आहे. या अभियानासाठी आ. बबनराव पाचपुते, आ. संग्राम जगताप, युवा नेते उदयन गडाख यांनी सहकार्य केले आहे. या उपक्रमाचा उद्देश आणि स्वच्छता अभियानाचे महत्त्व पटवून देताना, फाऊंडेशन चे प्रमुख अमर कळमकर यांनी सांगितले की, ११ वर्षापासून पंढरपुरात स्वच्छता अभियान राबवत आहोत. अशा अभियानाकडे सर्वांनी लक्ष देण्याची गरज आहे. जास्तीत जास्त युवकांनी सहभागी व्हायला हवे. चांद्रभागेमध्ये भाविकांनी अंधश्रद्धेपोटी कपडे व चपला टाकून घाण करू नये, असे आवाहन ही कळमकर यांनी केले आहे. या मोहिमेत विलास हारदे, ड. सुनील गडाख, ठकाराम गायखे, विष्णू लाळगे, संस्थेचे सचिव, योगेश काकडे, अनिकेत निंबाळकर, महेश अजबे, अर्जुन सोनवणे, पत्रकार सुभाष सुतार, राहुल रोकडे, सोमनाथ पाबळे, महेश लुंगसे, सुनीता घाडगे यांच्यासह शेकडो स्वयंसेवकांचा सहभाग होता.

# भारतीय काँग्रेसच्या वतीने मुस्लिम समाजाच्या प्रचंड मोर्च्यास जाहीर पाठिंबा

## मुस्लिम समाज राज्यकर्त्यांचा अन्याय सहन करणार नाही -दत्ता कांबळे

**माजलगाव ।प्रतिनिधी परळी वैद्यनाथ येथे विशाळगड व गजापूर प्रकरणा संधर्भात मुस्लिम समाजाच्या वतीने संविधानिक मार्गाने प्रचंड संख्येने तहसील कार्यालयावर मुफ्ती अश्फाक, मुफ्ती मुक्रम व समाजातील प्रतिष्ठीत नेतृत्व यांच्या नेतृत्वात मोर्चा काढण्यात आला. यावेळी माजी मंत्री अशोकराव पाटील व भारतीय काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रचंड मोठया संख्येने निघालेल्या मोर्च्यास भारतीय काँग्रेस अनु जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष व परळी मतदार संघाचे निरीक्षक दत्ता कांबळे हें शिष्टमंडळासह उपस्थित राहिले होते.**

यावेळी प्रचंड मोठया समुदायाला संबोधित करताना भारतीय काँग्रेस परळी विधानसभा मतदार संघांचे निरीक्षक दत्ता कांबळे यांनी प्रथम मुस्लिम समाजाच्या संविधानिक मागणीला परळी मतदार संघाचा भारतीय काँग्रेस पक्षाचा निरीक्षक या जिम्मेदारीने भारतीय काँग्रेस पक्षाचा अधिकृत जाहीर पाठिंबा दिला. यावेळी भारतीय काँग्रेस अनु जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी उपस्थित प्रचंड मोठया मुस्लिम समाज बांधवांच्या समुदायास जाहीर पाठिंबा देऊन, भारतीय काँग्रेस पक्ष व राज्यातील मुस्लिम समाज राज्यकर्त्यांचा कुठल्याही प्रकारचा सामाजिक अन्याय सहन करणार नसून, असे झाल्यास जिल्हाभरात भारतीय काँग्रेस पक्ष ताकदिनीशी मुस्लिम समाज बांधवांच्या पाठीशी संविधानिक मूल्य जपण्यासाठी उभा राहील असा इशारा परळी मतदार संघांचे निरीक्षक दत्ता कांबळे यांनी बोलत असताना राज्यकर्त्यांना दिला. यावेळी शिष्टमंडळात शहराध्यक्ष बहादुर शेख, जावेद शेख दीपक शिरसाट,रसूलखान,अल्ताफभाई,बदरभाई तुराब सह काँग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते.

## नामदार धनंजय मुंडे साहेबांच्या वाढदिवसानिमित्त

# अविनाश भाऊ नाईकवाडे युवा मंचच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रमाचा सेवा सप्ताह संपन्न

महाराष्ट्राचे कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. धनंजयजी मुंडे साहेब यांचा नुकताच वाढदिवस पार पडला. त्यांचावर प्रेम करणाऱ्या अनेकांनी त्यांना प्रत्यक्ष भेटून व सोशल मीडिया द्वारे शुभेच्छा दिल्या पण त्यांचे विश्वासू सहकारी अविनाश नाईकवाडे यांनी त्यांच्या सामाजिक कार्यातून सेवा सप्ताह आयोजित करत मा. ना. धनंजय मुंडे साहेबांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. दि. १५ जुलै ते २१ जुलै दरम्यान जिल्हा रुग्णालय बीड येथे या सेवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. यात दि. १५ जुलै रोजी नवजात बालकांच्या मतांच्या सन्मानार्थ बेबी किट वाटप कार्यक्रम, १६ जुलै रोजी उइउ, इडङ, इझ (क्ष्ङ) याचे मोफत तपासणी शिबिर, १७ जुलै रोजी आषाढी एकादशी निमित्त शाबुदाणा खिचडी व फळवाटप कार्यक्रम, १८ जुलै रोजी नेत्रदान शिबिर,१९ जुलै रोजी भव्य रक्तदान शिबिर तसेच २० व २१ जुलै रोजी गरजवंत विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत कार्यक्रम असे विविध कार्यक्रम आयोजित केलेले आहेत. सामाजिक, सांस्कृतिक, आरोग्य, शैक्षणिक अशा मूलभूत घटकांवर आधारित कार्यक्रम घेत समजामध्ये आदर्श निर्माण केला. हा कार्यक्रम अविनाश भाऊ नाईकवाडे युवा मंचच्या माध्यमातून

बीडमध्ये राबवण्यात आला होता यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे श्रेष्ठ नेते मोईन मास्टर साहेब बहुजन पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष थोरात साहेब तसेच हा सप्ताहाचा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी ज्यांचे अनमोल सहकार्य लाभले असे सिव्हिल सर्जन डॉक्टर बडे साहेब डॉक्टर पारखे साहेब डॉक्टर जाजू साहेब काळेसाहेब म्हात्रे साहेब संदीप जोगदंड व जिल्हा रुग्णालयातील सर्व कर्मचारी वर्ग तसेच प्रज्ञाताई खोसर (राष्ट्रवादी महिला काँग्रेस जिल्हाध्यक्ष) प्रिया डोईफोडे (राष्ट्रवादी युवती जिल्हाध्यक्ष), माऊली गायकवाड, रमीज शेख (अल्पसंख्याक सेलचे जिल्हा) नवीद शेख (शहराध्यक्ष अल्पसंख्य सेल) मोहिनी व्हावळ( राष्ट्रवादी युवती शहराध्यक्ष), शेख नसरीन (कामगार सेल शहराध्य), नूरुल खान राहुल गवळी,नितीन कोळी, गणेश ढगे, उतरेश्वर पाचंग्रे, झैद कादरी, सनी सातपुते, आकाश सोनवणे, मुकेश क्षीरसागर, अमीर शेख, राजाभाऊ लोंढे, अमर जाधव, तुषार मस्के, विशाल कुठले, सतीश नाईकवाडे, विकी कवठेकर, मंगेश नाईकवाडे, मनोज नखाते, स्वप्निल शेटे राजवीर आदी सहकाऱ्यांचा समावेश होता.

# २ किलोमीटर चिखल तुडवीत शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांची आर्तहाक; निदान शाळेत जायला रस्ता तरी द्या

## पाटोदा तालुक्यातील दासखेड येथील आरगडे, पवार, शिंदे,निर्मळ, गोरे वस्तीवरील विद्यार्थ्यांचे हाल :- डॉ.गणेश ढवळे

पाटोदा ।प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील दासखेड गावातील आरगडे वस्ती, पवार वस्ती, शिंदे वस्ती,निर्मळ वस्ती, गोरे वस्ती येथील शालेय विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी दासखेड गावातील जिल्हा परिषद आणि रयत शिक्षण संस्थेच्या शाळेत जाण्यासाठी पावसाळ्यात २ किलोमीटर अंतर हातात चप्पल घेऊन अनवानी पायाने चिखल तुडवीत जावे लागते. पावसाळ्यात आम्हाला त्रास होतो,पाय भरतात, पाय घसरून पडतोत, सटकतोत,निदान शाळेत जाण्यासाठी सरकारने चांगला रस्ता तरी द्या अशी आर्तहाक दिली असुन जिल्हा प्रशासनाने लक्ष देऊन तातडीने रस्ता करून देण्यात यावा अशी खंत विद्यार्थ्यांनी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या सोबत बोलून दाखवली. दरम्यान शासन एकीकडे बारावी, पदवी झालेल्या विद्यार्थ्यांना लाडका भाऊ योजनेच्या नावाखाली हजारों रूपये देत असल्याचा

गाजावाजा करत असुन दुसरीकडे मात्र शाळेत जायलाच रस्ता नसल्याचे भयाण वास्तव समोर येत असुन जिल्हा प्रशासनासाठी हि लाजिरवाणी बाब आहे.दासखेड पासुन २ किलोमीटर अंतरावरील आरगडे, पवार,निर्मळ, शिंदे,गोरे आडनावांची लोकं वस्तीवर वास्तव्य करत असुन दररोज जवळपास ३०० लोकांचा राबता याच रस्त्यावरून आहे.मात्र पावसाळ्यात रस्त्याची दुरावस्था होत असल्याने शालेय विद्यार्थी, बाजारहाट, दवाखाना, दुधदुभतं, भाजीपाला,खत बि बियाणे तसेच ईतर कामांसाठी गावात येजा करावी लागते.परंतु पावसाळ्यात चिखलामुळे अडचण येत असुन गाड्या घसरुन अपघाताच्या घटना घडलेल्या आहेत.शासनाने आम्हा वस्तीवरील ग्रामस्थांसाठी रस्ता दुरुस्त करून देण्यात यावा.अशी मागणी वस्तीवरील ग्रामस्थ नारायण शिंदे, भगवान शिंदे, सतिश ठाकुर,काका पवार यांनी केली आहे.

लोकप्रतिनिधी आणि जिल्हा प्रशासन ज्या पद्धतीने लाडकी बहिण योजनेसाठी रविवार सुट्टी असुन देखील शनिवार - रविवार दोन दिवशीय शिबिर घेण्यासाठी जिल्हा प्रशासन धावपळ करताना दिसत आहे.तेच लोकप्रतिनिधी आणि जिल्हा प्रशासन मात्र ग्रामीण भागातील शालेय विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मुलभूत सुविधा असणा-या रस्त्याच्या दुरावस्थेकडे लक्ष द्यायला तयार नाही. ग्रामस्थांनी शासन दरबारी हेलपाटे मारुन सुद्धा त्यांच्या पदरी निराशाच पडत असुन दुसरीकडे मात्र अधिकारी आणि गाव पुढारी संगनमताने कागदोपत्रीच बोगस रस्त्यावर लाखों रूपयांचा मलिदा खाताना दिसत आहे. एकीकडे शाळेत विद्यार्थ्यांची संख्या वाढावावी, विद्यार्थ्यांना शिक्षणाची गोडी लागावी म्हणून विविध उपक्रम राविणा-या जिल्हा प्रशासनाचे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी मोठी कसरत करावी लागते.याकडे मात्र प्रशासनाचे साफ दुर्लक्ष दिसून येत आहे.

# माजी पंचायत समिती सदस्य अनिल जाधव यांना जिल्हा परिषदेसाठी लोकांची पसंती

नेकनुर ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील मोठी बाजारपेठ आणि सर्वात मोठे जिल्हा परिषद सर्कल असलेले नेकनूर या गणाचे माजी पंचायत समिती सदस्य अनिल जाधव पंचवार्षिक पंचायत समिती सदस्य म्हणून होते. पाच वर्षामध्ये अनिल जाधव यांनी गोरगरिबांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. तसेच नेकनूर पंचायत समिती गणाअंतर्गत येणाऱ्या सर्व गावांमध्ये तसेच प्रत्येक गोरगरिबाच्या सुखदुःखामध्ये अनिल जाधव सहभागी असतात. यासाठी तरुण वर्ग हा अनिल जाधव यांच्या पाठीशी असताना पाहायला मिळत आहे. गेल्या पाच वर्षांमध्ये अनिल जाधव यांनी गोरगरिबांना विहीर, घरकुल यासारखे बरेच कामे करून दिले आहेत. अनिल जाधव हे एका छोटच्या कुटुंबातून वर आल्यामुळे त्यांना तरुण वर्ग आणि वयोवृद्ध सुद्धा पुढे घेऊन जाताना पाहायला मिळत आहे. पंचायत समिती सदस्य होण्याअगोदर अनिल जाधव हे गोरगरिबांच्या सुखदुःखामध्ये सहभागी असल्यामुळे त्यांचा मोठा विजय झाला होता. परंतु आता प्रत्येक लोकांच्या मनामध्ये अनिल जाधव हे जिल्हा परिषद सदस्य आहेत असेच पाहायला मिळत आहे. बीड जिल्ह्याचे आमदार संदीप क्षीरसागर यांचे ते खंदे समर्थक आहेत. तसेच बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे यांना खासदार करण्यामध्ये नेकनुर सर्कलमधून अनिल जाधव यांचा सिंहाचा वाटा असल्याचे सुद्धा बोलले जात आहे. राजकारणामध्ये आल्यापासून अनिल जाधव हे बजरंग सोनवणे आणि संदीप क्षीरसागर यांच्या सोबतच आहेत. प्रत्येक गावागावा मधून अनिल जाधव यांना आता जिल्हा परिषदेसाठी लोकांची पसंती असल्याचं पाहायला मिळत आहे. नक्कीच अनिल दादा प्रत्येक गावाचा विकास करतील अशीच अपेक्षा प्रत्येक लोकांमधून होताना पाहायला मिळत आहे. गोरगरिबातील जनतेचे प्रश्न अनिल जाधव सोडत असल्यामुळे यावर्षीचे जिल्हा परिषद सदस्य अनिल जाधव असतील असेच चिन्ह पाहायला मिळत आहे.

# स्वामी रामानंद तीर्थ व हैदराबाद मुक्ती संग्राम स्थळ प्रेरणादायी -के.के. बेदरकर

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

पू.स्वामी रामानंद तीर्थ यांनी निझामाच्या जुलमी राजवटीतून मराठवाडा मुक्त केला याचा संकलित इतिहास असलेले यो.शि.संस्थेने उभारलेले स्वामी रामानंद तीर्थ हैद्राबाद मुक्ती संग्राम स्मृतीस्थळ हे विद्यार्थ्यासाठी प्रेरणादायी असल्याचे मत सहशिक्षिका के.के. बेदरकर (पुजारी) यांनी व्यक्त केले. त्या योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या पू.स्वामी रामानंद तीर्थ व हैद्राबाद मुक्तीसंग्राम स्मृतीस्थळाला विद्यार्थिनींनी भेट देऊन पाहणी करताना बोलत होत्या. त्या

म्हणाल्या की स्वातंत्र्य पूर्वकाळात स्थापन झालेल्या योगेश्वरी शिक्षण संस्थेचा इतिहास दैदिप्यमान आहे. स्वामी रामानंद तीर्थ, बाबासाहेब परांजपे यांनी नंतरच्या काळात येथे येऊन मराठवाडा मुक्ती संग्रामाचे रणशिंग फुंकले आणि त्यांचे नेतृत्व उदयास आले यावेळी एल.सी. सरवदे म्हणाल्या की,संस्थेची पुर्वी चालू असलेली राष्ट्रीय शाळा शैक्षणिक दृष्ट्या प्रगल्भ केली

पुढे या संस्थेचा नावलौकिक वाढला शिक्षकांनी विद्यार्थ्यांवर चळवळीचे संस्कार केल्यामुळे एक आगळे वेगळे स्थान संस्थेने प्राप्त केल्याचेही त्या म्हणाल्या. यावेळी विद्यार्थिनी एल.जी.होळकर,बी. व्ही.पंधारेआदी उपस्थित होते.

## मानवी हक्क अभियान च्या वतीने उपजिल्हाधिकारी यांना

# जायकोचीवाडी येथील विविध समस्यांबाबत निवेदन देण्यात आले

प्रतिनिधी। सुनिल थोरात

सविस्तर माहिती अशी की माजलगाव तालुक्यातील जायकोचीवाडी येथे मूलभूत प्रश्न सुटलेले नाहीत भारत देशाला स्वातंत्र्य होऊन ७५ वर्षे उलटल्यानंतरही हे गाव विकासापासून कोसो दूर आहे. या गावात नागरिकांना अजून पण मूलभूत हक्कांसाठी संघर्ष करावा लागतो ही खूप मोठी शोकांतिका आहे. या गावात पिण्यासाठी पाणी नाही, रस्ते नाहीत, सांडपाण्यासाठी नाल्या नाहीत, लाईटची व्यवस्था नाही, गावामध्ये अजून पण बस येत नाही, तसेच गावामध्ये जाण्यासाठी रस्ता नाही शाळेची तर एवढी दयनीय अवस्था झालेली आहे की कधी भिंत विद्यार्थ्यांच्या अंगावर पडेल सांगता येत नाही. अशा अनेक समस्या आहेत या समस्या वर ना ग्रामपंचायत

काम करते ना आमदार काम करतात ना कुठले राजकीय पुढारी काम करतात या गावाचा फक्त मतदान पुरताच वापर केला जातो. या समस्या घेऊन मानवी हक्क अभियान संघटनेच्या माध्यमातून त्या गावात जाऊन समस्या जाणून घेऊन या संघटनेच्या वतीने आज उपजिल्हाधिकारी कार्यालय माजलगाव येथे निवेदन देण्यात आले. जर या समस्या तात्काळ सोडवल्या नाहीत तर येणाऱ्या काळात मानवी हक्क अभियानच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिलेला आहे. यावेळी निवेदनावर खालील लोकांच्या सह्या आहेत मधुकर कांबळे, रमेश गवळी, बाबासाहेब थोरात, संदीप वाघमारे, रमेश जाधव, मच्छिंद्र उपाडे, बबन खंडागळे, राजेश थोरात, कचरू कांबळे, सुंदर भिसे, प्रकाश थोरात, सुनील थोरात, आकाश लोखंडे, अक्षय थोरात, सचिन लोखंडे, रमेश लोखंडे, संजय हिवाळे, वसंत थोरात, भारत गायकवाड, रामभाऊ थोरात, सर्जेराव लोखंडे, राजू हिवाळे, लक्ष्मण थोरात, अर्जुन थोरात, सुरेश थोरात, बाजीराव खंडागळे, सुधाकर कांबळे, प्रल्हाद दळवी, संजय वाघमारे.

# लिंगायत वाणी समाजाचे प्रश्न सोडविणार-डॉ.योगेश क्षीरसागर

## बीडमध्ये वीरशैव लिंगायत वाणी समाज ट्रस्टच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार

बीड ।प्रतिनिधी

माजी नगराध्यक्ष डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांच्या पुढाकारातून काही वर्षांपूर्वी लिंगायत वाणी समाजासाठी दोन एकर जमीन उपलब्ध करून दिली आहे. त्या जागेवर स्मशानभूमीसह इतर सोयी सुविधा उपलब्ध केल्या आहेत. त्याठिकाणी दोन रूमसाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. यासह समाजाचे इतरही प्रश्न सोडविणार असल्याची ग्वाही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिली.

शहरातील पेठ बीड भागातील बुरुड गल्ली येथे वीरशैव लिंगायत वाणी समाज

ट्रस्टच्या नूतन कार्यकारिणीतील पदाधिकाऱ्यांचा डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते शुक्रवारी (दि.१९) सत्कार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.पुढे बोलताना त्यांनी नूतन कार्यकारिणीतील पदाधिकाऱ्यांना समाजकार्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच, अध्यक्ष रामेश्वरआप्पा कानडे, उपाध्यक्ष अमर ढेपे, सचिव अशोकआप्पा चिपाडे, सहसचिव राहुल मिटकरी, कोशाध्यक्ष विलास बेदरकर, सदस्यपदी पशुपती शेटे, संजय घाळे, अनंत शहागडकर, सचिन रेगुडे, अमोल होणराव, बाळू स्वामी आदींचा निवडीबद्दल सत्कार केला. यावेळी ज्येष्ठ नागरिक अनिलआप्पा मिटकरी, उत्तरेश्वर कानडे, अशोक भुरे, नागेश मिटकरी, बाळू मिटकरी, शिवप्रकाश कानडे, रामलिंग साळप्पा, प्रभुलिंग शेटे, महादेव गाडवे, अर्जुन वडतीले, दत्ता परळकर, विद्याभूषण बेदरकर, शुभम कुलथे, अमोल वडतीले यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बीडच्या ध्येयपूर्ती निवासी गुरुकुल मध्ये विद्यार्थ्यांनी घेतली व्यसनमुक्तीची शपथ

## सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब सोलंकर या युवकांच्या माध्यमातून घेतली विद्यार्थ्यांनी शपथ

बीड ।प्रतिनिधी

बीड शहरातील ध्येयपूर्ती निवासी गुरुकुल या ठिकाणी गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी घेतली व्यसनमुक्तीची शपथ 'मी गांभीर्यपूर्वक शपथ घेतो, की मी माझ्या आयुष्यात कुठल्याही प्रकारचं व्यसन लागू देणार नाही. मी अजीवन निर्व्यसनी राहीन. मी प्रत्येक भारतीय नागरिकांने निर्व्यवसणी राहण्यासाठी प्रयत्नशील राहील. मी अशीही प्रतिज्ञा करतो, की मी व्यसनमुक्ती साठी असलेल्या कायद्यांचे काटेकोरपणे पालन करीन. नवीन कायदे होण्यासाठी सक्रिय राहीन. मी सर्व नागरिकांमध्ये व्यसनमुक्त समाज निर्माण

करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्नशील राहू अमली पदार्थाच्या विरोधात आयुष्यभर कार्यरत राहण्याचा संकल्प करतो'., बीड मधील अनेक शाळा महाविद्यालयांचा सहभाग विद्यार्थ्यांना भारत नशा मुक्त व्हावा यासाठी शपथ देण्यात आली. विद्यार्थ्यांनी व्यसन करू नये जे या देशासाठी करता येईल ते करावे. असे आव्हान यावेळी सोलंकर यांनी केले. यावेळी या गुरुकुलचे संचालक रामेश्वर काळे सर, युवा पत्रकार अंकुश गवळी आधी विद्यार्थी उपस्थित,

सव्वाशेर खांडेकर सर देवकुळे सर उदावंत सर शिंदे मॅडम बिडकर मॅडम वाधवणे मॅडम आषाढी एकादशी निमित्त जिल्हा परिषद शाळेमध्ये केळी वाटप विकास भिसे अनिल भिसे अंकुश भिसे गोपाल भिसे बाबासाहेब भिसे आबा भिसे माऊली भिसे

# सिरसदेवी जवळ बसचा आणि मोटारसायकलचा अपघात

## दोन विद्यार्थी गंभीर जखमी

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : तासिका करुन दुचाकीवरुन गावाकडे परत जात असताना समोरुन येत असलेल्या एसटीला दुचाकी धडकल्याने दोन विद्यार्थी गंभीर जखमी झाल्याची घटना आज सकाळी पाथर्डी-विशाखापट्टमण राष्ट्रीय महामार्गावरील सिरसदेवी जवळील रुई फाटा येथे घडली. करण गणेश उनवणे (वय १८)व कृष्णा अनिल लोखंडे(वय १९) रा.रुई ता गेवराई असे या अपघातात गंभीर जखमी झालेल्या विद्यार्थ्याचे नावे आहेत.दहावी नंतरचे शिक्षण घेत असल्याने

निट,सीईटी तयारी करिता हे विद्यार्थी सिरसदेवी येथे एका खासगी कोचिंग लावले असल्यामुळे नेहमीप्रमाणे गणेश आणि कृष्णा कोचिंग संपल्याने सिरसदेवी येथुन पाथर्डी-विशाखापट्टमण राष्ट्रीय महामार्गावरून दुचाकीवरुन रुईला जात असताना, समोरील येत असलेल्या माजलगाव-पुणे बसला दुचाकी धडकल्याने दुचाकीवरील गणेश उनवणे, कृष्णा लोखंडे गंभीर जखमी झाले.

जखमी विद्यार्थ्यांना बीड येथील खासगी रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले असून, यातील एकाची प्रकृती चिंताजनक असल्याची माहीती आहे.

# श्री क्षेत्र चाकरवाडीमध्ये उद्या गुरुपौर्णिमेनिमित्त नाना महाराज कदम यांचे कीर्तन

बीड ।प्रतिनिधी

महाराष्ट्रातील धाकटी मंडळी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री क्षेत्र चाकरवाडी मध्ये प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी २० व्या शतकातील महान संत विभूती सद्गुरु संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज श्रीक्षेत्र चाकरवाडी यांच्या पवित्र पावन भूमीमध्ये गुरुपौर्णिमा महोत्सवा निमित्त दिनांक २१ जुलै २०२४ रोजी प्रमुख मार्गदर्शक तपो निधी शांतीब्रह्म गुरुवर्य श्री.ह.भ.प महादेव महाराज ( तात्या ) श्रीक्षेत्र चाकरवाडी यांच्या मार्गदर्शनाखाली रामायणाचार्य श्री.ह.भ.प नाना

महाराज कदम श्री बंकटस्वामी महाराज मठ संस्थान श्रीक्षेत्र नेकनूर यांचे कीर्तन होणार आहे कीर्तनानंतर महाप्रसादीक महापंगत होणार आहे. तरी गुरुपौर्णिमेनिमित्त होणाऱ्या सर्व कार्यक्रमांचा भावी भक्तांनी आवश्यक लाभ घ्यावा असे आवाहन संस्थांचे मठाधिपती शांतीब्रह्म गुरुवर्य महादेव महाराज तात्या यांनी केले आहे.

सिरसमार्ग येथे वृक्ष प्रेमी सत्यवान रडे,ओंकार गंचाडे , लखन पवळ, नागेश रडे शहादेव टाकसाळ, भिमा राजळकर मित्रांनी आज स्वतः वर्गणी गोळा करून १६ झाडांना लोखंडी जाळी लावली. वृक्ष संवर्धनाची जबाबदारी घेतली

# आगामी विधानसभा निवडणुका शिवसेना ताकदीने लढवणार आणि जिंकणार

## शिवसेना बीड जिल्हा संपर्क प्रमुख परशुराम जाधव

बीड ।प्रतिनिधी

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नवनियुक्त संपर्कप्रमुख माननीय परशुराम जाधव साहेब याचा संपर्कप्रमुख पदी नियुक्ती झाल्यानंतर पहिलाच दौरा होता या अनुषंगाने बीड जिल्ह्यातील संपूर्ण जिल्ह्यातील शिवसेनेच्या कार्याचा आढावा घेण्यासाठी दिनांक १९ जुलै २०२४ रोजी जिल्हास्तरीय आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आलेले होते सदरील बैठकीमध्ये बीड जिल्ह्यातील एकूण सहा विधानसभा मतदार संघाचा आढावा घेण्यात आला व त्या अनुषंगाने बोलताना संपर्कप्रमुख श्री परशुराम जाधव यांनी असे म्हटले की बीड जिल्हा हा पहिल्यापासूनच शिवसेनेचा बालेकिल्ला राहिलेला असून प्रत्येक तालुक्यामध्ये विधानसभेमध्ये व गावमध्ये शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे व पक्षप्रमुख माननीय उद्धव बाळासाहेब ठाकरे व युवा सेना प्रमुख आदित्य ठाकरे यांना मानणारा व त्यांच्यावर प्रेम करणारा मोठा वर्ग आहे बीड जिल्ह्यात शिवसेनेसाठी वातावरण अत्यंत पोषक असून बीड जिल्ह्यातील सहाही मतदारसंघात शिवसेनेने जर उमेदवार उभे केले तर शंभर टक्के यशाची खात्री असल्याचे

सांगितले व बीड जिल्ह्यातील सर्वच्या सर्व विधानसभा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष हा आपल्या संपूर्ण ताकतीने व जोमाने लढवणार असून तो जिंकल्याशिवाय राहणार नाही असे प्रतिपादन संपर्कप्रमुख परशुराम जाधव यांनी केले व आढावा बैठकीच्या निमित्ताने उपस्थित असलेल्या शिवसेनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांना गाव,सर्कल व बूथ स्तरावर जोमाने कामाला लागण्याच्या सूचना केल्या यावेळी माजी मंत्री बदामराव पंडित माजी आमदार सुनील दादा धांडे,सहसंपर्कप्रमुख डॉक्टर लक्षराज सानप,सह संपर्क प्रमुख बाळासाहेब अंबुरे,जिल्हाप्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे,बीड शहर प्रमुख शेख निजाम भाई यांची समायोजित भाषणे झाली व उपस्थित असणाऱ्यांना मार्गदर्शन करून कामाला लागण्याच्या सूचना देण्यात आल्या यावेळी बोलताना जिल्हाप्रमुख परमेश्वर जी सातपुते यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हटले की शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे व पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे साहेब यांनी जो विश्वास बीड जिल्ह्यातील शिवसेना पदाधिकाऱ्यावर टाकलेला आहे तो विश्वास कधीही तुटू देणार नाही व बीड जिल्ह्यातील सर्वच्या सर्व विधानसभेच्या जागा जिंकून शिवसेनेचा भगवा बीड जिल्ह्यावर फडकवणार असल्याचे सांगितले यावेळी जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांनी बीड जिल्ह्यातील शिवसेना व शिवसैनिक हे बाळासाहेबांच्या विचारांचे कडवट शिवसैनिक असून उद्धवजी ठाकरे साहेब यांच्या आदेशाचे काटेकोर पालन करून बीड जिल्ह्यातील सर्व विधानसभेवर शिवसेनेचा भगवा फडकवल्याशिवाय राहणार नाही असे प्रतिपादन केले..

यावेळी उपजिल्हाप्रमुख आदिनाथ खेडकर,उपजिल्हाप्रमुख रामराजे सोळुंके, उपजिल्हाप्रमुख हनुमान जिजा जगताप,उपजिल्हाप्रमुख राजूभाऊ महूवाले, उपजिल्हाप्रमुख आशिष मस्के, उपजिल्हाप्रमुख बंडू पिंगळे, उपजिल्हाप्रमुख शिवाजी दादा कुलकर्णी, उपजिल्हाप्रमुख दिपक मोराळे, उपजिल्हाप्रमुख नारायण सातपुते, जिल्हा समन्वयक संजय भाई महाद्वार, जिल्हा समन्वयक अशोक गाढवे, जिल्हा संघटक रतन तात्या गुजर, बीड तालुका प्रमुख गोरख आण्णा सिंघण,शिरूर तालुका प्रमुख सोपान काका मोरे, आष्टी तालुका प्रमुख सुभाष राऊत, माजलगाव तालुका प्रमुख पप्पू धरपडे,केज तालुका प्रमुख अशोक जाधव, अंबाजोगाई तालुका प्रमुख बाळासाहेब शेप, परळी तालुका प्रमुख भोजराज पालीवाल सह बीड जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी व सर्व अंगीकृत संघटनांचे पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या उपस्थित होते....!!!

# रामसेठ राठोड लागले माजलगाव विधानसभेच्या तयारीला

## ५०० गाड्यांच्या ताफ्यासह कार्यकर्त्यांचा लवाजमा घेऊन पोहरादेवीस रवाना

सबंध महाराष्ट्र मध्ये आगामी विधानसभेचे वारे वाहू लागले आहे नेते कार्यकर्ते, आमदार, मंत्री हे आपणास उमेदवारी मिळावी यासाठी फिल्डिंग लावत असून यासाठी वाटेल ती किंमत मोजण्यास तयार आहेत. पक्षाने उमेदवारी न दिल्यास पक्ष बदलणे अथवा अपक्ष लढणे असे अनेक निर्धार ही मंडळी करत असल्याचे दिसून येते. मात्र वारंवार आमदारकी भोगत असलेले, व जुने नेतेमंडळी जे की, भावी आमदारकीचे स्वप्न पाहत आज पर्यंत ज्यांना पक्षाने उमेदवारी दिली नाही ते पक्षाशी एकनिष्ठ राहून निवडणुकीच्या तोंडावर पक्षाने उमेदवारी न दिल्याने इतर पक्षात जातात. अशाही लोकांना मतदार संघातील जनता कंटाळली असून यावेळी नवीन चेहरा, युवा नेतृत्व, जनतेप्रती काहीतरी करण्याची धडपड, तरुणांच्या हाताला काम मिळावे यासाठी सदैव प्रयत्नशील, तसेच सर्वसामान्य कुटुंबातून हलकीच्या परिस्थितीशी सामना करत गरिबी काय असते याची जाणीव असणारे रामशेठ राठोड हेच मतदार संघाचा विकास करू शकतील असा ठाम विश्वास मतदारां मधून व्यक्त होत असल्याने मतदारातून रामशेठ राठोड यांना पसंती दर्शविली जात आहे

माजलगाव तालुक्यातील सर्व परिचित असलेल्या एका छोट्याशा मोगरा या गावातील सर्वसामान्य कुटुंबात जन्मास आलेले रामसेठ राठोड हे मायानगरी समजल्या जाणाऱ्या मुंबई येथे उद्योजक म्हणून नावारूपास आलेले तरुण, युवा व्यक्तिमत्व आहे. गेली अनेक वर्षापासून तळागाळातील लोकांपासून ते सर्व समाजातील लोकांसोबत तसेच युवा, तरुणांसोबत त्यांचे जिव्हाळ्याचे व एकोप्याचे संबंध असून त्यांनी तालुक्यात मजबूत पकड निर्माण केलेली आहे. राजकीय,

सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रामध्ये त्यांचे अमूल्य योगदान आहे. वंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्ताने गरीब विद्यार्थ्यांना १०००० वह्यांचे वाटप केले असून याच दिनी त्यांनी १००० विविध जातीच्या वृक्षांचे वाटप करून शहरातील विविध क्षेत्रातील लोकांना वृक्षारोपण करण्याचा संदेश दिला. नायक प्रतिष्ठानच्या माध्यमातून तालुक्यातील सुशिक्षित बेरोजगार असलेल्या १००० तरुणांना उद्योगाच्या माध्यमातून नोकऱ्या देण्याचा मनोदय व्यक्त केला असून यामुळे अनेकांचे कुटुंबास मदत होणार आहे.

अशा या सर्वसामान्य कुटुंबातील परिस्थितीशी दोन हात करत उद्योजक असा प्रवास करणाऱ्या बंजारा समाजातून येणाऱ्या रामशेठ राठोड यांनी ओबीसी समाजातून निवडणूक लढवावी असे सर्व समाजातील घटकातून मत व्यक्त होत आहे. माजलगाव विधानसभा मतदारसंघाला अशाच युवा, तरुण, कुशल व उभरत्या नेतृत्वाची गरज आहे. मतदार संघातील बंजारा, वंजारा, धनगर, मुस्लिम, दलित, गरजवंत मराठा तसेच इतर लहान मोठ्या जाती एकत्र येऊन रामशेठ राठोड यांना ओबीसी समुदायातून विधिमंडळात पाठवण्याचा निर्णय मतदारांनी घेतला असून दि.१८/७/२०२४ रोजी दुपारी रामशेठ राठोड हे ५०० गाड्यांचा ताफा घेऊन बंजारा समाजाचे आराध्य दैवत असलेल्या पोहरादेवी येथे रवाना झाले. पोहरादेवी दर्शन घेऊन आल्यानंतर ते लवकरच मतदारांसमोर आपली भूमिका स्पष्ट करतील.

# गेवराईत आढळून आला एका युवकाचा संशयास्पद मृतदेह

## ●पोलिसांचा तपास सुरू●

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : सोलापूर-छत्रपती संभाजीनगर राष्ट्रीय महामार्गावरील हॉटेल चावार्क पाठीमागील एका पुलाजवळ संजयनगर येथील युवकाचा संशयास्पद मृत्यू झाल्याची घटना आज सकाळी उघडकीस आली आहे. संभाजी हरीभाऊ गायकवाड (वय. ३६) संजय नगर,ता गेवराई असे मृत युवकाचे नाव आहे.

आज सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास सोलापूर-छत्रपती संभाजीनगर राष्ट्रीय महामार्गावरील हॉटेल चावार्क च्या पाठीमागील पुलाजवळ सिमेंट रस्त्यालगत युवकाचा मृतदेह नागरिकांना दिसून आला.या घटनेची माहीती मिळताच गेवराई पोलिस घटनास्थळावर दाखल झाले.मृतदेह उत्तरीय तपासणी साठी गेवराई उपजिल्हा रूग्णालयात पाठवण्यात आला आहे. सदरील युवकाचा घात की अपघात शवविच्छेदन अवहाल आल्यानंतर आणि तपासानंतर खरा प्रकार उघडकीस येईल असे गेवराई पोलिसांकडून सांगण्यात आले.

# परदेश शिक्षण शिष्यवृत्तीच्या जाचक अटी अखेर रद्द

## इंजि. अक्षय गोटेगावकर

## सम्यक विद्यार्थी आंदोलनाच्या लढ्याला, पाठपुराव्याला यश !

पुणे / प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाकडून राबवली जाणारी राजर्षी छत्रपती शाहू महाराज परदेश शिष्यवृत्ती योजना पारदर्शी, शाहू महाराज परदेश शिक्षण शिष्यवृत्ती योजना प्रभावीपनणे राबवण्यात राज्य शासन, प्रशासन सपशेल नापास झाल्याचे सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे पुणे जिल्हा निरीक्षक तसेच ज्ञानमाता माहिती अधिकार कार्यकर्ते नागरिक समूह महाराष्ट्र राज्य प्रचार व प्रसारक अक्षय गोटेगावकर त्यांनी अधोरेखित केले होते. परदेश शिक्षण शिष्यवृत्ती रद्द केले नाही तर राज्यभर तीव्र निदर्शनासह आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी सामाजिक न्याय विभागाला दिला होता. त्याचा परिणाम म्हणून अक्षय गोटेगावकर यांच्या ईशाऱ्याची शासनाने दखल घेत प्रदेश शिक्षण शिष्यवृत्तीच्या जाचक अटी रद्द केले आहेत. वंचित बहुजन आघाडी व सम्यक विद्यार्थी आंदोलनाच्या लढ्याला यश आले आहे. सम्यक विद्यार्थी आंदोलनामुळे परदेशी शिष्यवृत्ती मिळणार.

विद्यार्थ्यांना दिलासा! परदेशी शिष्यवृत्तीतील जाचक अटी अखेर रद्द

पदवीमध्ये ५५ टक्के गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्याला परदेशी शिष्यवृत्तीचा लाभ घेता येणार परदेशी विद्यापीठाचे सर्व शुल्क सरकार भरणार एका कुटुंबातील दोन विद्यार्थ्यांना लाभ मिळणार ८ लाखांची उत्पन्न मर्यादा कायम असल्याने लढा सुरुच राहणार वंचित बहुजन आघाडी आणि सम्यक आंदोलनाने घेतला पुढाकार मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या परदेशी शिक्षणाचा मार्ग झाला मोकळा त्यामुळे परदेश शिक्षण शिष्यवृत्तीचे अर्जदार विद्यार्थ्यांकडून सम्यक विद्यार्थी आंदोलन सल्लागार समिती महाराष्ट्र राज्य, प्रा. अंजलीताई आंबेडकर, डॉ. अरुण सावंत महेश भारतीय सर यांचे आभार व्यक्त करत आहेत.

# विशाळगड गाजापुर अतिक्रमण प्रकरणी बीडमध्ये दिसला अनोखा लढा

## सर्व जाती धर्मातील लोकांनी दिली शफिक भाऊंना साथ हम सब है एक चा नारा

### पोलिसांचा तगडा बंदोबस्त; वाहतूक वळविली...

शहरातील बशीरगंज चौकात निषेध आंदोलन करण्यात आले. या पार्श्वभूमीवर शहर वाहतूक शाखा पोलिसांचा तगडा बंदोबस्त होता. काही काळ बशीरगंज चौकातील वाहतूक इतरत्र वळविण्यात आली होती. बीड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ, वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक सुभाष सानप यांच्यासह पोलीस कर्मचाऱ्यांचा मोठा बंदोबस्त होता.

जिथे जिथे अन्याय होईल तिथे या विरोधात वेगवेगळ्या जातीतील समाज सामाजिक सलोखा राखण्यासाठी खंबीरपणे समाज उभा राहीलअतिक्रमण सर्वांचेच पण मस्जिदवर हातोडा मारणाऱ्या औलादी कोण : भागवत तावरेअडीच वाजता निषेध करण्यासाठी जनसमुदाय काळे झेंडे हाती घेऊन बशीरगंजमध्ये धडकलासर्व धर्मियांचा या निषेध आंदोलनाला पाठिंबा; वाद लावणारे बीडमध्ये तोंडावर आपटले गेवराई, परळीतही निषेध आंदोलनाला मोठा प्रतिसाद.

### शफिक भाऊ ची एक हात आणि अठरापगड जातींची साथ.

### जातीला थारा न देता एकवटले सर्व जाती धर्मातील बंधू भगिनी.

बीड प्रतिनिधी - जातीच राजकारण आणि दोन समाजामध्ये तेढ निर्माण करण्याचे प्रयत्न जातीयवाद यांचे आहेत याच जातीवादातून महाराष्ट्रामध्ये सध्या वादाच्या भवऱ्यामध्ये सापडलेले विशाळगड प्रकरण आहे यामध्ये विशाळगडावर अतिक्रमण होत आहे हे सरकारच्या लक्षात आदुगर आले नसेल का स्थानिक राजकारण यामध्ये नसेल का? अशा वेगवेगळ्या मुद्द्यांमध्ये मात्र मुस्लिम समाजाला टार्गेट केला जातय का हिंदू मुस्लिम दंगल कोणाला घडवायचे आहे का असाही प्रश्न यावेळी उपस्थित होत आहे. विशाळगड गाजापूर येथील अतिक्रमणाचे प्रकरण न्यायप्रविष्ठ असताना काही समाजकंटकांनी अतिक्रम हटाव मोहिमेच्या नावाखाली हिंसाचार केल्याचा संतापजनक प्रकार काही दिवसांपूर्वी घडला आहे. त्याच्या निषेधार्थ बीड जिल्ह्यासह राज्यभरात ठिकठिकाणी निषेध नोंदविला जात आहे. याचाच भाग म्हणून बीड शहरातील बशीरगंज चौकात संतप्त मुस्लिम समाज शुक्रवारी मोठ्या संख्येने एकवटला होता. या आंदोलनास सर्वधर्माचे लोक यानी पाठिंबा देत संबंधित घटनेचा निषेध करण्यात आला

शफिक भाऊंनी विशाळगड अतिक्रमण हटाव च्या विरोधात आवाज उठवला आणि सर्व जाती धर्म शफिक भाऊच्या केला धावून आला. एमआयएमचे जिल्हाध्यक्ष ड. शफीक शेख यांच्या पुढाकारातून विशाळगड - गाजापूर प्रकरणी निषेध आंदोलनाची हाक देण्यात आली होती. या आंदोलनाच्या निमित्ताने मुस्लिम समाज मोठ्या संख्येने एकवटला. शिंदे फडवणीस पवार च्या

सरकार मुर्दाबाद, घोषणांनी बशीरगंज चौक परिसर दणाणला होता. यावेळी अनेक राजकीय पक्ष सामाजिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त करून निषेध केला. तसेच सहभागी झाल्याचे दिसून आले. त्यामुळे हम सब एक है क्या जनभावना जनतेच्या मनातून व्यक्त होत होती. दरम्यान, एमआयएमचे जिल्हाध्यक्ष ड. शफीक शेख, मराठा क्रांती मोर्चा चे समन्वयक सी.ए.बी.बी.जाधव, पत्रकार भागवत तावरे, ऑल इंडिया पँथर सेनेचे जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे, यांच्यासह अनेकांनी मनोगत व्यक्त केले. राष्ट्रगीताने निषेध आंदोलनाची सांगता झाली.

ॲड. शफीक सर्वधमीय लोक आंदोलनात भाऊच्या आव्हानावर माणुसकीचा आपल्या एकीचा विचाराचा सर्व जाती धर्माचा समाज एकवटला.बीड जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांच्याकडून कडून

### गजापूर विशाळगड मध्ये झालेल्या घटने संदर्भात एमआयएम बशीरगंज येथील निदर्शनास ऑल इंडिया पँथर सेनेचा जाहीर पाठिंबा. पँथर नितीन सोनवणे

मुस्लिम समाजाच्या अस्मितेचा आणि भावनांचा संबंध ज्या धार्मिक स्थळाशी असतो त्या धार्मिक स्थळावर काही द्वेषीवृत्तीचे लोक अचानकपणे हल्ले चढवतात हातात तलवारी काट्या घेऊन मुस्लिमांच्या धर्मस्थळाची आणि घरादारांची संपत्तीची तोडफोड करून त्यांच्या संपत्तीची लूट करतात त्यांना मानसिक आर्थिक नुकसान पोहोचवतात याला तीन-चार दिवस उलटून गेले तरी यावर सत्ताधारी पक्ष व विरोधी पक्ष व मीडिया बोलायला तयार नाही याचा ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने जाहीर निषेध करत आहोत.

विशाळगडाच्या अतिक्रमणाचा विषय हा न्यायालयीन प्रक्रियेचा भाग आहे त्यासाठी कायदा आहे शासन आहे कायद्यानुसार त्यावर निर्णय होईल अशाप्रकारे धुडगुस घालून तलवारी हातात घेऊन उद्रेक पसरवण्याचा प्रकार पुरोगामी महाराष्ट्रात होत आहे हा अशोभनीय आहे आणि स्वतःला पुरोगामी म्हणून घेणारे या गंभीर प्रकरणावर साधी प्रतिक्रिया सुद्धा देत नाहीत ही सर्वात मोठी शोकांतिका आहे विशाळगड प्रकरणातील आरोपींना कठोर शिक्षा करण्यात यावी त्या ठिकाणी झालेल्या नुकसानीची नुकसान भरपाई देण्यात यावी व कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी पदाचा राजीनामा द्यावा अशी ऑल इंडिया पँथर सेना बीड जिल्ह्याच्या वतीने मागणी करत आहोत.

संघटनेच्या वतीने आम्ही जिल्हाधिकारी मार्फत गृहमंत्र्याकडे मागणी करत आहोत या सर्व घडलेल्या घटनेची सखोल चौकशी उखऊ मार्फत करण्यात यावी. यामधील सर्व हल्लेखोरांवर ण-झ- कायद्या अंतर्गत कडक कारवाई करण्यात यावी.संबंधित निष्क्रिय पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे तात्काळ निलंबित करण्यात यावे. मुस्लिम समाजाच्या घरांची प्रत्येकी १० लाख रुपये व स्थळांची शासनाने नुकसान भरपाई देण्यात यावी. अन्यथा ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने तीव्र आंदोलन केले जाईल.

### कोल्हापूर विशालगडाच्या पायथ्याशी धार्मिक स्थळांची विटंबना करणार्या आरोपींना तात्काळ कठोर शासन करा - जावेद पठाण

माजलगाव ।प्रतिनिधी

गेल्या दोन दिवसांपूर्वी कोल्हापूर जिल्ह्यातील विशालगडाच्या पायथ्याशी असलेल्या गाजापुर या ठिकाणी हातात तलवारी धारदार शस्त्र आणि दगड हातात घेवून एकच हल्ला चढवला समाज कंटकांनी मुस्लिमांच्या घरांची, संपत्तीची नासधूस करत दर्गाह आणि मजीद या धार्मिक स्थळांची विटंबना करणार्या आरोपींना तात्काळ कठोर शासन करावे अशी मागणी समाजिक कार्यकर्ते जावेद पठाण यांनी केली आहे.अतिक्रमण काढण्याच्या नावाखाली अतिरेक झाल्या सारखेच आहे पवित्र मस्जिद आणि दर्गाशरीफ गेल्या अनेक वर्षापासून त्या ठिकाणी आहे.अतिक्रमनाचा प्रश्न न्यायालयात न्यायप्रविष्ट असल्याने त्यावर निर्णय न्याय पालिका घेईल असे अचानक पने घुसून हल्ला चढवणे आणि मुस्लिमांच्या घरांची नासधूस करत त्यांच्या जीवाला आणि संपत्तीला इजा पोहचणे ही कोणती अतिक्रमण हटाव मोहीम अतिक्रमण काढायचे की ठेवायचे या बाबत निर्णय शासन न्यायपालिका घेईल असे हिंसक प्रकार करून धार्मिक स्थळांचा अपमान करून काय साध्य होणार आहे, व याची परवानगी कोणी दिली याची देखील चौकशी झाली पाहिजे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुरोगामी महाराष्ट्रात असे निंदनीय प्रकार अशोभनीय आहे सर्व धर्मियांची धार्मिक स्थळे ही त्यांच्या धार्मिक अस्मितेचा प्रश्न असतो आणि त्यावरील हल्ला हा मनाला वेदना देणारा ठरतो, व अश्या घटना सामाजिक सलोखा बिघडवण्यासाठी कारण ठरत असतात म्हणून या हल्ल्या मागे जो कोणी सूत्रधार असेल त्याची पाळेमुळे शोधून महाराष्ट्राचं सामाजिक वातावरण बिघडवणार्या आणि गाजापुर या ठिकाणी मुस्लिमांच्या संपत्तीची त्यांच्या घरांची आणि धार्मिक स्थळांची नासधूस करणार्या लोकांचा शोध घेवून त्यांना कठोर शासन करावे अशी मागणी समाजिक कार्यकर्ते जावेद पठाण यांनी केली आहे.

# स्वरगंध कराओके क्लब ने फुलवला विठ्ठल भक्तिगीतांचा मळा

(प्रतिनिधी ) आषाढी एकादशी निमित्त सायंकाळी बीड शहरातील विठ्ठल साई मंदिरात विठ्ठल भक्तीगीतांची सुरेल अशी भक्तीसंध्या सादर करून, तिथे उपस्थित भक्तांना मंत्रमुग्ध केले.या बाबत सविस्तर वृत्त असे की आषाढी एकादशी च्या पावन पर्वात अवघा महाराष्ट्रातील लाखो वारकऱ्यांचे श्रद्धास्थान असणाऱ्या विठुमाऊली चा गजर चालु असताना मागील काही आठवड्यापासून असंख्य भक्तगण विठ्ठलाच्या भेटीसाठी शेकडो किलोमीटर चे अंतर पायी चालत जावून आपल्या आराध्य दैवताच्या दर्शनासाठी आतुर होते त्याच भक्तिभावाने बीड मधील अनेक विठ्ठल मंदिरात ही भक्तीभावानं अनेक भक्त पोहचले होते. बीडकरांच श्रध्दास्थान विठ्ठल साई मंदिरात काल स्वरगंध कराओके क्लब च्या गायक गायिकांनी काल विविध भक्तिगीते सादर केली. या स्वराभिषेकाचा प्रारंभ स्वरगंध कराओके क्लबच्या संचालिका सुवर्णा धुतेकर कुलकर्णी यांनी ओंकार प्रधान रूप गणेशाचे या गीताने केला तर क्लब चे मुख्य प्रशिक्षक प्रा.अभय पटवारी यांनी विठू माऊली तु माऊली जगाची,व देहाची तिजोरी भक्तीचाच ठेवा ही गीते प्रभावी पणे सादर केली.

पुढे या कार्यक्रमात प्रियंका भंडारी यांनी विठ्ठल नामाची शाळा भरली , सुनिता केंडे यांनी देव माझा विठु सावळा , राजेशकुमार जोगदंड यांनी तुझे रूप चित्ती राहो, मंजूषा गोहेल यांनी कानडा राजा पंढरीचा ,दीपक धनवे यांनी मागतो मी पांडुरंगा हेच एक दान , शोभा शृंगारे -जोगदंड यांनी चंद्रभागेच्या तीरी ,ऍड.मनीषा दळवी यांनी धरिला पंढरीचा चोर ,आरती परळकर यांनी विठ्ठलाच्या पायी वीट ,अशा भारती यांनी तुज मागतो मी आता ,ऍड वर्षा दळवी यांनी केशवा माधवा तुझ्या नामात रे गोडवा ,अनुराधा कौंडण्य यांनीअवघे गरजे पंढरपूर ,राजू भैय्या यांनी शोधिसि मानावा राऊळी मंदिरी ,पूजा जोशी यांनी गेला हरी कुणा गावा ही एकाहून एक सरस गीते गायली याच कार्यक्रमात मीनाक्षी देशमुख यांनी पारंपरिक एकादशी सादर केली तर या भक्तिसंध्येचा समारोप सुवर्णा धुतेकर- कुलकर्णी यांनी रामा रघु नंदना ही भैरवी गाऊन केला .या स्वरसंध्येचं निवेदन प्रा.अभय पटवारी यांनी अनेक ऐतिहासिक व भक्तीमय संदर्भ देत अतिशय

प्रभावी पद्धतीनं केले .

या कार्यक्रमासाठी विठ्ठल साई प्रतिष्ठान चे अशोकराव जगताप यांचे विशेष सहकार्य लाभले तर या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजकुमार कुलकर्णी ,सुमित कुलकर्णी ,दीपक धनवे,राजेशकुमार जोगदंड,राजूभैय्या यांनी विशेष परिश्रम केले.या भक्तीसंध्येचा रसास्वाद बहुसंख्य श्रोतावर्गाने घेतला व सर्वच भक्तीगीतांना उत्स्फूर्त दाद दिली.

### शैलेंद्र पोटभरे यांच्या उपस्थितीत रिपाई एकतावादीचा संकल्प मेळावा बहुसंख्येने उपस्थित रहा- जावळे डोंगरे

धारूर ।प्रतिनिधी

धारूर तालुका मोजे चौरंबा व चारदरी येथे रिपाई एकतावादी शाखा उद्घाटन सोहळा व कार्यकर्ता संकल्प मेळावा दिनांक २१ रोज रविवार सायंकाळी ६:५० आयोजित केला असून या मेळाव्यात समाज बांधवांनी बहुसंख्येने उपस्थित रहावे या मेळाव्यास प्रमुख मार्गदर्शक म्हणून शैलेंद्र पोटभरे जिल्हाध्यक्ष उपस्थित राहणार आहेत, असे आव्हान धारूर तालुका कार्याध्यक्ष संतोष जावळे तालुका उपाध्यक्ष इंद्रजीत डोंगरे यांनी केले तालुक्यातील समाज बांधवांनी या मेळाव्यास बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आव्हान केले.



हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT